# मेट्रो भुयारीकरणाचे पाव शतक



## तानसा-१ने २ हजार ७३ मीटर भुयारीकरण पूर्ण केले

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३च्या भुयारीकरणाचा २५वा टप्पा बुधवारी वरळी येथे पार पडला. मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक व वरळी या स्थानकांचा समावेश असलेला भुयाराचा हा सर्वांत मोठा टप्पा आहे.

या कामासाठी टनेल बोअरिंग मशीन तानसा१ सायन्स म्युझियमच्या उत्तर दिशेपासून २७ सप्टेंबर, २०१८ रोजी कार्यान्वित झाले. भौगोलिक आव्हानांना सामोरे जाऊन अप लाइन बोगद्याचे २ हजार ७३ मीटर भुयारीकरण २९ जानेवारी, २०२०ला १७ महिन्यांनी पूर्ण झाले. यासाठी १ हजार ३८१ सेगमेंट रिंग्सचा वापर करण्यात आला.

याबाबत माहिती देताना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल म्हणाले, प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा मला आनंद आहे.